

# आ. सतेज पाटील यांनी मारल्या विद्यार्थ्यांशी गप्पा

**कोल्हापूर :** शहर जिल्हा विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने महाविद्यालायातील विद्यार्थ्यांसाठी राबवला जातोय 'कॉफी विथ सतेज पाटील प्रोग्राम'. यामध्ये आमदार सतेज पाटील विविध कॉलेजच्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत युवकांच्या नवकल्पना, समस्या, प्रश्न, त्यांचे मत जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करतात. या कार्यक्रमाची सुरुवात विवेकानंद महाविद्यालय, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजच्या विद्यार्थ्यांसोबत झाली.

दर १५ दिवसांतून एकदा प्रत्येक महाविद्यालयाजवळील कॅफेमध्ये हा कार्यक्रम घेतला जातो. कॉफीचा आस्वाद घेत विद्यार्थी मनमोकळा संवाद आमदार पाटील यांच्यासोबत करतात. या तरुणाईची ऊर्जा, त्यांची स्वप्ने आणि नावीन्यपूर्ण विचार प्रेरणा देत असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांशी होत असलेल्या संवादातून त्यांच्या नवदृष्टिकोनाबरोबरच पुढच्या पिढीतील आशावाद नक्कीच जागृत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याचे नियोजन अक्षय शेळके, उमेश पाडळकर, दीपक थोरात, अथर्व चौगुले, मुबीन मुश्रीफ, यश शिर्के, निपुण चौगुले, प्रणव पाटील, स्वराज भाट, गौरव कांबळे, रोहित गाडीवडर, प्रथमेश पाटील, ओंकार मगदूम, ऋतुराज पाटील आदी करत आहेत.

Coffee with Satej Patil